**एसबीआय कार्डच्या सर्वांत महत्त्वपूर्ण अटी व शर्ती**

**1. फीस आणि शुल्क**

A. वार्षिक फीस आणि रिन्युअल फीस

एसबीआय क्रेडीट कार्ड (एसबीआय कार्ड) ह्यावर वार्षिक फीस आणि रिन्युअल फीस लागू आहेत. वार्षिक फीस हे एक वेळचे शुल्क असते आणि रिन्युअल फीस दर वर्षी लावली जाते. ह्या फीस कार्डधारकांसाठी वेगळ्या असू शकतात आणि त्या विविध प्रकारच्या कार्डसाठी वेगवेगळ्या असतात. क्रेडीट कार्डचे आवेदन करताना हे कार्डधारकाला सांगण्यात आल्याप्रमाणे असेल. लागू असतील त्यानुसार ह्या फीस कार्डधारकाच्या खात्यातून जमा केल्या जातील आणि जेव्हा हे लावले जाईल, तेव्हा त्याचे बिल त्या महिन्याच्या कार्ड स्टेटमेंटमध्ये दर्शवले जाईल. प्राथमिक कार्डधारकाला जारी करण्यात आलेल्या अतिरिक्त कार्डससाठी वेगळी फीस असू शकेल.

**B. कॅश एडव्हान्स फीस**

आपात्कालीन स्थितीमध्ये देशातील/ आंतरराष्ट्रीय एटीएम्समधून रोख रक्कम काढण्यासाठी कार्डधारक कार्डचा वापर करू शकतो. अशा प्रकारे काढलेल्या सर्व कॅशवर ट्रान्सॅक्शन फी लावली जाईल आणि ती कार्डधारकाच्या पुढच्या स्टेटमेंटच्या बिलामध्ये जोडली जाईल. देशातील एटीएम्ससाठी 2.5% किंवा रू. 300 ह्यापैकी अधिक असलेली ट्रान्सॅक्शन फीस लावली जाईल आणि आंतरराष्ट्रीय एटीएम्ससाठी 3% किंवा रू. 300 ह्यापैकी अधिक असलेली ट्रान्सॅक्शन फीस लावली जाईल. एसबीआय कार्डस अँड पेमेंट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या (SBICPSL) निर्णयानुसार ट्रान्सॅक्शन फीस बदलली जाऊ शकते. सर्व कॅश एडव्हान्सेसवर रक्कम काढल्यापासून पूर्ण रक्कम जमा करण्याच्या दिनांकापर्यंत रिव्हॉल्व्हिंग क्रेडीट इतके आर्थिक शुल्कसुद्धा असेल (कृपया शुल्कांची सूची पाहावी).

**C. रोख भरणा फीस**

कार्डधारक निवडक एसबीआय बँक शाखांमध्ये किंवा एसबीआय सहकारी बँकांमध्ये जाऊ शकतो आणि पे- इन स्लिपमध्ये क्रेडीट कार्ड नंबर आणि रक्कम देऊन व ती त्याच शाखेतील काउंटरवर जमा करून एसबीआय क्रेडीट कार्डमध्ये देण्याची (ड्यूज) रक्कम भरू शकतो. आपले बिल भरल्यानंतर लगेचच भरणा झाल्याची पोच पावती आपल्याला देण्यात येईल. ही सेवा रू. 100 + सर्व लागू करांसह उपलब्ध आहे.

**D. शुल्क**

i. एसबीआयसीपीएसएलद्वारे कार्डधारकाला देण्यात येणा-या विशिष्ट सेवांसाठी वेळोवेळी लागू असलेले शुल्क आणि फीस कार्डधारकाला भरावे लागेल किंवा कार्ड खात्याच्या संदर्भात कार्डधारकाकडून दिरंगाई झाली, तर त्यासाठी फीस भरावी लागेल.

ii कार्डधारकांना योग्य माहिती देऊन वेळोवेळी आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणतेही शुल्क किंवा फीसमध्ये बदल करण्याचा किंवा नवीन शुल्क किंवा फीस सुरू करण्याचा अधिकार एसबीआयसीपीएसएलजवळ सुरक्षित आहे.

**E. व्याज मुक्त ग्रेस अवधी**

व्याजमुक्त क्रेडीट अवधी 20 ते 50 दिवसांचा असू शकतो व तो मर्चंटद्वारे करण्यात येणा-या दाव्यांवर अवलंबून असेल. परंतु, जर आधीच्या महिन्याची बाकी पूर्णत: जमा केली नसेल किंवा जर कार्डहोल्डारने कोणत्याही एटीएममधून रोख रक्कम काढली असेल, तर हे लागू असणार नाही.

**F. आर्थिक शुल्क (सेवा शुल्क)**

जर कार्डधारकाने बाकी रक्कम पूर्ण भरली नाही तर आणि कार्डधारकाने काढलेल्या सर्व रोख रकमांवर (कॅश एडव्हान्सेस) ते परत भरले जाईपर्यंत ट्रान्सॅक्शनच्या दिनांकापासून न भरलेल्या ईएमआय इन्स्टॉलमेंटसह सर्व ट्रान्सॅक्शन्सवर मासिक व्याज दरानुसार आर्थिक शुल्क देय आहेत. कार्ड व्याज दर बदलणारा आहे आणि तो कार्डधारकाचा वापर आणि रक्कम जमा करण्याच्या शैलीवर आधारित असेल व त्यामची नियमित समीक्षा केली जाईल. जर कार्ड धारकाने रकमेच्या मुदतीच्या तारखेअगोदर (PDD) राहिलेल्या रकमेची (TAD) थोडी रक्कम किंवा काहीच रक्कम नाही भरली; जसे की ग्राहकांची आधीच्या महिन्यातील देय रक्कम आणि सध्याच्या महिन्यातील पूर्ण देय रक्कम मुदत संपायच्या तारखेअगोदर भरले तर उरलेल्या रकमेवर रकमेच्या तारखेपर्यंत शुल्क आकारले जाईल. सध्याचा आर्थिक शुल्काचा दर ट्रान्सॅक्शनच्या दिनांकापासून प्रति माह 3.35% पर्यंत आहे [40.2% प्रति वर्ष] व एसबीआय कार्डस अँड पेमेंट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या (SBICPSL) निर्णयानुसार बदलला जाऊ शकतो. लागू असलेले आर्थिक शुल्क लागू करांनुसार ठरेल आणि कार्डवरील थकित रक्कम पूर्णत: जमा होईपर्यंत ते कार्डधारकाच्या खात्यामध्ये लावले जातील/ वजा केले जातील.

a. कॅश एडव्हानेसवरील आर्थिक शुल्क ट्रान्सॅक्शनच्या दिनांकापासून पूर्ण रक्कम जमा करेपर्यंत लागू असतील.

**उदाहरण 1 - कार्ड स्टेटमेंट दिनांक - दर महिन्याच्या 15 तारखेला**

16 जून '15 - 15 जुलै '15 मध्ये करण्यात आलेले ट्रान्सॅक्शन्स

1. रू. 5000 ची रिटेल खरेदी - 20 जून '15 रोजी
2. रू. 7000 कॅश काढली- 10 जुलै '15 रोजी

15 जून 2015 च्या स्टेटमेंटमधून कोणतीही आधीची शिल्लक राहिलेली नाही, असे गृहित धरून कार्डधारकाला त्याचे 15 जुलै 2015 च्या स्टेटमेंटमध्ये रू. 12,000 इतके ट्रान्सॅक्शन्स दिसेल व त्यावर रू. 7000 च्या काढलेल्या रोख रकमेवर 5 दिवसांचे आर्थिक शुल्क लागू दरानुसार लावले जाईल. कार्डधारकाला बाकी (थकित) रकमेसाठी 5 ऑगस्ट 2015 पर्यंत म्हणजे स्टेटमेंट दिनांकापासून 20 दिवसांच्या आत भरणा करावा लागेल जी पूर्ण रक्कम असू शकते किंवा देय असलेली किमान रक्कम असू शकते. कृपया लक्षात घ्या की, आपल्या क्रेडीट कार्डमधील थकित रकमेसंदर्भात केलेल्या भरण्याद्वारे पहिल्यांदा आपली किमान देय रक्कम (मिनिमम अमाउंट ड्यू) [(ज्यामध्ये सर्व लागू कर, ईएमआय आधारित उत्पादनांवरील ईएमआय + एकूण थकित रकमेवरील 5% असेल)], फीस आणि अन्य शुल्क (असल्यास) व त्यानंतर बॅलन्स ट्रान्सफर बॅलन्स (असल्यास), रिटेल बॅलन्स (असल्यास) ह्यासाठी घेतली जाईल आणि ती आपल्या शिल्लक कॅश संदर्भात (असल्यास) एडजस्ट केली जाईल. आधीच्या स्टेटमेंटच्या दिनांकापासून आर्थिक शुल्क लावले जाईल व जर व्याज नसलेला आउटस्टँडिंग रिटेल बॅलन्स असेल तर त्या स्थितीमध्ये आर्थिक शुल्क ट्रान्सॅक्शनच्या दिनांकापासून लावले जाईल.

जर आधीच्या स्टेटमेंटमध्ये कोणतीही कॅश शिल्लक नसेल आणि ती आधीच्या स्टेटमेंटमधून पुढे आलेली नसेल आणि स्टेटमेंटच्या दिनांकाचा रिटेल बॅलन्स भरणा देय असलेल्या दिनांकावर पूर्णत: भरण्यात आला, तर अशा बॅलन्सेसवर कोणतेही आर्थिक शुल्क लावले जाणार नाही.

**उदाहरण** 2 - **कार्ड स्टेटमेंट दिनांक - दर महिन्याच्या** 2 **तारखेला**.

3 जानेवारी '15 - 2 फेब्रुवारी '15 मध्ये केलेले ट्रान्सॅक्शन्स

1. रू. 10000 रिटेल खरेदी - 5 जानेवारी '15 रोजी

2. रू. 30000 ऑनलाईन खरेदी- 15 जानेवारी ’15 रोजी

2 जानेवारी 2015 स्टेटमेंटमधून आधीची कोणतीही शिल्लक रक्कम पुढे उरलेली नाही, असे गृहित धरून कार्डधारकाला त्याच्या 2 फेब्रुवारी स्टेटमेंटमध्ये रू. 40,000 व्यवहार दिसतील. कार्डधारकाला ह्या आउटस्टँडिंग रकमेसाठी स्टेटमेंट दिनांकापासून 20 दिवसांच्या आत म्हणजे 22 फेब्रुवारी 2015 पर्यंत भरणा करावा लागेल व तो पूर्ण रक्कम किंवा किमान देय रक्कम ह्यातील कोणतीही रक्कम भरू शकतो.

जर स्टेटमेंट आउटस्टँडिंगमध्ये कोणताच कॅश बॅलन्स नसेल आणि तो आधीच्या स्टेटमेंटपासून पुढे आलेला नसेल आणि जर स्टेटमेंट दिनांका रोजी आउटस्टँडिंग असलेल्या रिटेल बॅलन्सला रक्कम देय दिनांकाला जर पूर्णत: भरण्यात आले, तर अशा बॅलन्सेसवर कोणतेही आर्थिक शुल्क लावले जाणार नाही.

दर महिन्यामध्ये फक्त किमान रक्कम भरल्यास त्यामुळे रिपेमेंट वर्षापेक्षा जास्त काळ पुढे जाईल व आपल्या आउटस्टँडिंग बॅलन्सवर त्यानुसार ठरणारा व्याज लागेल. उदाहरणार्थ, रू. 5000 इतक्या ट्रान्सॅक्शनवर दर महिन्याला फक्त किमान देय रक्कम भरण्यात आली (दर महा रू. 200 इतकी किमान रक्कम असल्यास), संपूर्ण थकित रकमेच्या पूर्ण भरण्यासाठी 44 महिने इतका अवधी लागेल.

**उदाहरण** 3 -

कार्ड स्टेटमेंट दिनांक - प्रत्येक महिन्याच्या 2 तारखेला

3 मार्च 15- 2 एप्रिल ’15 मध्ये केलेले ट्रान्सॅक्शन

(1) रू. 500 वार्षिक फीस - 5 मार्च ’15 रोजी

(2) रू. 72.50 लागू कर - 5 मार्च ’15 रोजी

(3) रू. 6000 ची ऑनलाईन खरेदी - 15 मार्च ’15 रोजी

2 मार्च 2015 च्या स्टेटमेंटनुसार आधीचा कोणताही बॅलन्स पुढे शिल्लक राहिलेला नाही, असे गृहित धरून, कार्डधारकाला त्याच्या 2 एप्रिलच्या स्टेटमेंटमध्ये रू. 6752.50 ट्रान्सॅक्शन्स दिसेल. एकूण देय असलेली रक्कम रू. 6573 इतकी राउंड ऑफ केली जाईल. कार्डधारकाला स्टेटमेंटच्या दिनांकापासून 20 दिवसांनी 22 एप्रिल

रोजी 2015 ह्या आउटस्टँडिंगसाठी रक्कम भरावी लागेल व ती पूर्ण रक्कम असू शकते किंवा देय असलेली किमान रक्कम असू शकते.

22 एप्रिल 2015 रोजी कार्डधारक किमान देय रकमेचा म्हणजे रू. 398 (एकूण आउटस्टँडिंगच्या 5%) + 22 एप्रिल 2015, रोजी लागू असलेले कर ह्याच्या सर्वांत जवळच्या दशांश अंकावरील रक्कम ह्या रकमेचा भरणा करतो, असे गृहित धरून लागू दराने आर्थिक शुल्क लागू केले जाईल आणि ते एकूण आउटस्टँडिंगमध्ये जोडले जाईल. दर वर्षी 3.35% इतक्या प्रभावी दराला विचारात घेता, आर्थिक शुल्काची गणना पुढील प्रमाणे केली जाईल:

49 दिवसांसाठी रू. 500 बॅलन्स रकमेवर (5 मार्च ते 22 एप्रिल): (3.35∗12)∗(49/365)∗500/100= रू. 26.98

49 दिवसांसाठी लागू असलेल्या रू. 72.5 करांसाठी (5 मार्च ते 22 एप्रिल): (3.35∗12)∗(49/365)∗72.50/100= रू. 3.91

39 दिवसांसाठी रू. 6000 इतक्या बॅलन्ससाठी (15 मार्च ते 22 एप्रिल): (3.35∗12)∗(39/365)∗6000/100= रू. 257.72

10 दिवसांसाठी रू. 6,175 बॅलन्ससाठी (22 एप्रिल ते 2मे): (3.35∗12)∗(10/365)∗6,175 /100= रू. 68

एकूण लावण्यात आलेले व्याज = रू. 356.61

3 एप्रिल '15 आणि 2 मे '15 ह्या काळात कार्डधारकाने कोणतेही ट्रान्सॅक्शन केले नाही, असे गृहित धरून दिनांक 2 मेच्या स्टेटमेंटमध्ये असलेल्या एकूण रकमेमध्ये आउटस्टँडिंग एकूण रक्कम, व्याज शुल्क, फीस आणि अन्य शुल्क (असल्यास) आणि सर्व लागू कर दर्शवले जातील.

जर कार्डधारकाने दर महिन्याला किमान देय रक्कम (5%) भरली आणि व्याज राशी भरणे सुरू ठेवले, तर तो ते आउटस्टँडिंग 20 महिन्यांमध्ये पूर्ण भरेल (100%/ 5% - 20).

उदाहरण 4:

कार्ड स्टेट्मेंट तारीख - प्रत्येक महिन्याच्या 2 तारखेला.

व्यवहार 3 डिसेंबर 2015 - 2 जानेवारी 2016 दरम्यान झाले.

एसबीआयसीपीएसएल दर धोरण

1) किरकोळ खरेदी रु. 500 - 15 डिसेंबरला झाली
2) ऑनलाइन खरेदी रु. 600 - 20 डिसेंबरला झाली

मागील शिल्लक 2 डिसेंबर 2015 विधान पुढे चालविली गृहीत धरून, कार्डधारकाचे त्याच्या 2 जानेवारी विधान दर्शवित रुपये मिळतील. 1100 व्यवहार रु मुळे एकूण amound. 1100. कार्डधारकाचे संपूर्ण रक्कम किंवा किमान देय रक्कम दरम्यान काही 22 जानेवारी 2016, विधान पासून तारीख म्हणजे 20 दिवस, बाकी विरुद्ध भरणा करणे आवश्यक आहे

गृहीत धरू या की कार्ड धारकाने थोडी रक्कम 22 जानेवारी 2016 ला रु. 500 ने जमा केली आहे, वित्त शुल्क प्रभावी के दराने कर आकारला आणि एकूण थकबाकी केला जाईल. खालील म्हणून 3.35% प.म. प्रभावी दर लक्षात घेता, वित्त शुल्क गणना केली जाईल.

39 दिवसांसाठी रु. 500 च्या रकमेवर (15 डिसेंबर ते 22 जानेवारी):
(3.35*12) * (39/365) *500/100 = रु. 21.48

34 दिवसांसाठी रु. 600 च्या रकमेवर (20 डिसेंबर ते 22 जानेवारी)
(3.35*12) * (34/365) *600/100 = रु. 22.47

10 दिवसांसाठी रु. 600 च्या रकमेवर (22 जानेवारी ते 2 फेब्रुवारी)
(3.35*12) * (10/365) *600/100 = रु. 6.61

लागलेले एकूण व्याज : रु. 50.56

व्यवहार 3 फेब्रुवारी 2016 - 2 मार्च 2016 दरम्यान झाले

1) सुरुवातीची शिल्लक रु. 650.56 - 3 फेब्रुवारी 16 ला

2) किरकोळ खरेदी रु. 1000 - 5 फेब्रुवारी' 16 ला

3) ऑनलाइन खरेदी रु. 3000 - 15 फेब्रुवारी' 16 ला

गृहीत धरू या की मागील शिल्लक रु. 650.46 2 फेब 2016 च्या विधानानुसार पुढे सुरू करू या. कार्डधारकाचे संपूर्ण रक्कम किंवा किमान देय रक्कम दरम्यान काही 22 फेब्रुवारी 2016, विधान पासून तारीख म्हणजे 20 दिवस, बाकी विरुद्ध भरणा करणे आवश्यक आहे.

गृहीत धरून कार्ड देय तारीख 15 फेब्रुवारी म्हणजे पूर्णपणे भरणा करते. खालील म्हणून 3.35% p.m. प्रभावी दर लक्षात घेता, वित्त शुल्क गणना केली जाईल:

12 दिवसांसाठी रु. 650 च्या रकमेवर (3 फेब -15 फेब)
(3.35*12) *(12/365) * 650.56/100 = रु. 8.60

लागलेले एकूण व्याज : रु 8.60

खरेदीची उरलेली रक्कम, व्याजाची रक्कम, फी आणि शुल्क यांची बेरीज, आणि 2 मार्च तारखेच्या स्टेट्मेंटनुसार एकूण रककमेवर सर्व लागू कर परवर्तीत होईल.

**G. उशीरा भरणा शुल्क**

जर पेमेंट देय असण्याच्या दिवशी किमान देय राशीचा भरणा करण्यात आला नाही, तर उशीरा भरणा शुल्क (लेट पेमेंट चार्जेस) लागू असेल.
रू. 0- रू. 200 इतक्या एकूण देय रकमेसाठी शून्य;
रू. 200 ते रू. 500 एकूण देय रकमेसाठी रू. 100;
रू. 500 ते रू. 1000 एकूण देय रकमेसाठी रू. 400;
रू. 1000 ते रू. 10,000 एकूण देय रकमेसाठी रू. 500;
रू. 10,000 पेक्षा जास्त एकूण देय रकमेसाठी रू. 750;

**उदाहरण** 1 -

कार्ड स्टेटमेंट दिनांक - प्रत्येक महिन्याच्या 2 तारखेला

3 जानेवारी ’15 - 2 फेब्रुवारी ’15 ह्या काळात केलेले ट्रान्सॅक्शन

(1) रू. 5000 ची रिटेल खरेदी- 5 जानेवारी ’15 रोजी

(2) रू. 5000 ची ऑनलाईन खरेदी- 15 जानेवारी ’15 रोजी

2 जानेवारी 2015 च्या स्टेटमेंटमधून कोणताही आधीचा बॅलन्स पुढे आलेला नाही, असे गृहित धरून कार्डधारकाला त्याचे 2 फेब्रुवारीच्या स्टेटमेंटमध्ये रू. 10,000 ट्रान्सॅक्शन्स दिसतील. कार्डधारकाला स्टेटमेंट दिनांकापासून 20 दिवसांच्या आत म्हणजे 22 फेब्रुवारीपर्यंत आउटस्टँडिंगच्या संदर्भात भरणा करणे आवश्यक असेल व ही रक्कम किमान देय राशी ते संपूर्ण रक्कम ह्यापैकी काहीही असू शकेल.

जर 22 फेब्रुवारी 2015 रोजी किंवा त्याआधी कार्डधारकाने किमान देय रकमेचा भरणा केला नाही, तर त्याला रू. 500 इतके उशीरा भरणा शुल्क लावले जाईल (रू. 1000 पेक्षा जास्त व रू. 10,000 पेक्षा कमी रकमेसाठी रू. 500).

**उदाहरण** 2 -

कार्ड स्टेटमेंट दिनांक - दर महिन्याच्या 2 तारखेला.

3 फेब्रुवारी '15 - 2 मार्च '15 मधील ट्रान्सॅक्शन

1. रू. 2000 ची रिटेल खरेदी- 8 फेब्रुवारी '15 रोजी
2. रू. 2500 ची ऑनलाईन खरेदी - 19 फेब्रुवारी '15 रोजी

2 फेब्रुवारी 2015 च्या स्टेटमेंटपासून कोणताही आधीचा बॅलन्स पुढे आलेला नाही, असे गृहित धरून, दि. 2 मार्चच्या स्टेटमेंटमध्ये कार्डधारकाला रू. 4500 चे ट्रान्सॅक्शन मिळेल. स्टेटमेंट दिनांकापासून 20 दिवसांपर्यंत म्हणजे 22 मार्च 2015 रोजी कार्डधारकाला आउटस्टँडिंगच्या संदर्भात भरणा करणे आवश्यक असेल व ही रक्कम किमान देय राशी ते संपूर्ण रक्कम ह्यापैकी काहीही असू शकेल.

जर 22 फेब्रुवारी 2015 रोजी किंवा त्याआधी कार्डधारकाने कोणत्याही रकमेचा भरणा केला नाही, तर त्याला रू. 500 इतके उशीरा भरणा शुल्क लावले जाईल (रू. 1000 पेक्षा जास्त व रू. 10,000 पेक्षा कमी रकमेसाठी रू. 500).

H. **ओव्हरलिमिट फीस-** सेवेचा घटक म्हणून क्रेडीट लिमिटच्या वर व जास्त असलेल्या कार्डधारकाच्या काही विशिष्ट ट्रान्सॅक्शन्सना एसबीआयकार्ड मान्यता देऊ शकेल. कृपया लक्षात घ्या की, जर आउटस्टँडींग रक्कम क्रेडीट मर्यादेच्या बाहेर असेल, तर ओव्हर लिमिट असलेल्या रकमेच्या 2.5% इतकी किंवा रू. 500 ह्यापैकी मोठी असलेली राशी ओव्हर लिमिट फी म्हणून लावली जाईल. फीस आणि/ किंवा व्याज शुल्कांमुळेसुद्धा ओव्हर लिमिट स्टेटस लावला जाऊ शकतो.

**I. पेमेंट डिसऑनर फीस**

पेमेंट डिसऑनर झाल्यास (भरणा जमा न केल्यास), कार्डधारकाला रकमेच्या 2% इतकी पेमेंट डिसऑनर फीस लावली जाईल व त्याचे किमान शुल्क रू. 350 इतके असेल.

**J. अन्य शुल्क:**

- कार्ड रिप्लेसमेंट फी: रू. 100 - रू. 250
- चार्जस्लिप रिट्रिवल फी: रू. 225/
- चेक फी: रु. 100 (देयके रु चेक द्वारे केले. 2000)
- चेक पिक अप फी: रू.90/-
- स्टेटमेंट रिट्रिवल फी: रू. 2 महिन्यांपेक्षा जुन्या स्टेटमेंटससाठी रू. 100/- प्रति स्टेटमेंट
- विदेशी चलन ट्रान्सॅक्शन फी: 3.5%.
- परकीय चलन व्यवहार शुल्क: 3.5% (एलिट वगळता सर्व कार्ड)
  1.99% (एलिट कार्डधारक केवळ)

विदेशी चलन ट्रान्सॅक्शनचे रुपांतर भारतीय रूपयामध्ये करण्यासाठी विनिमय दर व्हिसा/ मास्टरकार्डद्वारे (जे असेल त्यानुसार) निर्धारित केला जाईल व ह्या ट्रान्सॅक्शनला एसबीआय कार्डच्या मदतीने सेटल केले जात असतानाच्या दिवशी त्यांच्या विनिमय दरांनुसार ते ठरेल व हे दर ट्रान्सॅक्शन करण्यात येणा-या दिवसापेक्षा भिन्न असू शकतील. व्हिसा/ मास्टरकार्ड द्वारे भारतीय रूपयामध्ये रुपांतरित करण्यात येणा-या रकमेवर 3.5% विदेशी चलन ट्रान्सॅक्शन फी लागू असेल. परकीय चलन व्यवहार शुल्क व्हिसा / मास्टर शेअर केलेले रुपये रुपांतर रकमेवर लागू केले जाईल

**2. लिमिटस (मर्यादा)**

अंतर्गत एसबीआयसीपीएसएल क्रेडीट निकषांनुसार (प्राथमिक खातेधारकांना असलेली क्रेडीट लिमिट जोडल्या जाणा-या एड ऑन कार्डधारकांना असेल) क्रेडीट लिमिट आणि कॅश लिमिट निर्धारित केली जाते. कार्ड दिले जात असताना ह्या मर्यादांची माहिती कार्डधारकाला दिली जाते. प्रत्येक स्टेटमेंटमध्ये क्रेडीट लिमिट

आणि कॅश लिमिट कार्डधारकाला सांगितल्या जातात. स्टेटमेंट बनवले जात असताना उपलब्ध क्रेडीट लिमिट (वापरासाठी उपलब्ध असलेली क्रेडीट लिमिट) स्टेटमेंटचा भाग म्हणून दिली जाते. एसबीआयसीपीएसएल कार्डधारकाच्या खात्याचा ठराविक काळाने आढावा घेते आणि अंतर्गत निकषांनुसार कार्डधारकाची क्रेडीट लिमिट घटवू किंवा वाढवू शकते. क्रेडीट लिमिट वाढवू इच्छित असलेले कार्डधारक एसबीआयसीपीएसएलला तसे लिहून व त्यांच्या उत्पन्नाची घोषणा करणारी आर्थिक कागदपत्रे पाठवून तशी विनंती करू शकतात. ह्या नवीन कागदपत्रांच्या आधारे अशी लिमिट वाढवायची अथवा नाही, हा निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य एसबीआयसीपीएसएलला आहे.

## 3. बिलिंग आणि स्टेटमेंट

a) ज्या अवधीमध्ये कार्ड एक्टिव्ह असेल त्या अवधीमधील आधीच्या स्टेटमेंटनंतर कार्डधारकाच्या खात्यामध्ये क्रेडीट करण्यात आलेले पेमेंटस व झालेले ट्रान्सॅक्शन्स दर्शवणारे एक मासिक स्टेटमेंट एसबीआयसीपीएसएलद्वारे कार्डधारकाला पाठवण्यात येईल. एक तर एसबीआयसीपीएसएल कार्ड खात्यामधील ट्रान्सॅक्शन्सचे स्टेटमेंट पोस्टाने त्याच्याकडे नोंदणीकृत असलेल्या पत्त्यावर पाठवेल किंवा ते स्टेटमेंट नोंद असलेल्या ईमेल आयडीवर ईमेलने पाठवेल व ह्याचा दिवस पूर्व निर्धारित असेल.

b) क्रेडीट कार्डस कार्डधारकांना रिवॉल्विंग क्रेडीट सुविधा देतात (फिरती पत). कार्डधारक फक्त स्टेटमेंटवर प्रिंट करण्यात आलेल्या किमान देय रकमेइतकी रक्कम सुद्धा भरू शकतो आणि असा भरणा त्याने रक्कम देय दिनांकाच्या आधी करायला हवा आणि हाही दिनांक आपल्या स्टेटमेंटवर नमूद केलेला असतो. आउटस्टँडिंग बॅलन्स पुढील स्टेटमेंटमध्ये फॉरवर्ड केला जाऊ शकतो. कार्डधारक देय असलेली संपूर्ण राशी भरू शकतो किंवा किमान देय रकमेपेक्षा मोठी कोणतीही रक्कम भरू शकतो.

   आधीच्या स्टेटमेंटसमध्ये न भरण्यात आलेली किमान देय रक्कम कार्डधारकाच्या करंट किमान देय रकमेमध्ये जोडली जाईल व त्यासह आउटस्टँडिंग असेल जे कार्डहोल्डरच्या क्रेडीट लिमिटपेक्षा जास्त होऊ शकते.

किमान देय रक्कम आउटस्टँडिंग रकमेच्या 5% किंवा रू. 200 ह्यापैकी जी रक्कम मोठी असेल, ती असेल व त्यामध्ये सर्व लागू कर आणि ईएमआय (फक्त ईएमआय आधारित उत्पादनांच्या संदर्भात) समाविष्ट असतील. जर कॅश किंवा क्रेडीट लिमिट ओलांडली गेली तर ओव्हरलिमिट (ओव्हीएल) रकमेचाही समावेश एमएडीमध्ये (किमान देय रक्कम) केला जाईल. आधीच्या स्टेटमेंटसमध्ये जर न भरण्यात आलेली एमएडी असेल, तर ती किमान देय रकमेमध्ये जोडली जाईल.

c) कार्ड आउटस्टँडिंगसाठी करण्यात येणा-या पेमेंटस पुढील स्टेटमेंटसमध्ये दर्शवल्या जातील.

d) कार्डधारकाच्या कार्ड आउटस्टँडिंगसाठी मिळालेल्या पेमेंटसमध्ये सर्व किमान देय रकमा (ज्यामध्ये सर्व लागू कर + ईएमआय आधारित उत्पादनांसाठीचे ईएमआय + एकूण आउटस्टँडिंगच्या 5% भाग), फीस आणि अन्य शुल्क, व्याज शुल्क, बॅलन्स ट्रान्सफर आउटस्टँडिंग, पर्चेस आउटस्टँडिंग आणि त्या क्रमामधील कॅश एडव्हान्स ह्यांचा समावेश असेल.

e) कार्ड खात्यामधील पेमेंटस पुढीलपैकी कोणत्याही प्रकारे करता येऊ शकतील:
www.sbicard.com वर लॉग इन करून नेटबँकिंग किंवा आपल्या एसबीआय एटीएम- कम डेबिट कार्डद्वारे पेनेट पर्याय वापरून.
स्टेटमेंटच्या मागच्या बाजूला दिलेल्या पत्त्यावर चेक किंवा धनादेश पाठवून.
आपल्या शहरातील एसबीआय कार्ड ड्रॉप बॉक्सेसमध्ये किंवा निर्धारित स्टेट बँक ऑफ इंडिया शाखांमध्ये चेक किंवा धनादेश देऊन.
चेक/ धनादेश “एसबीआय कार्ड क्र. xxxx xxxx xxxx xxxx“ करीता देय असा असायला हवा.
ईसीएस: निवडक शहरांमध्ये इलेक्ट्रॉनिक क्लीअरिंग प्रणालिद्वारे (ECS) पेमेंटस करता येऊ शकतील.

f) एसबीआय कार्डद्वारे आउटस्टँडिंग बिलाच्या भरणासाठी विविध पद्धती दिल्या जातात व त्याचे वर्णन एसबीआय कार्ड वेबसाईट आणि मासिक स्टेटमेंटच्या मागे सविस्तर दिले गेले आहे.

g) बिलिंग संदर्भातील वाद: स्टेटमेंटच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत कार्डधारकाने काही त्रुटी एसबीआयसीपीएसएलला कळवल्याशिवाय आणि एसबीआयसीपीएसएलला त्या सत्य आहेत, हे आढळल्याव्यतिरिक्त सर्व स्टेटमेंटस योग्य मानली जातील व कार्डधारक त्यांना मान्य करेल. असे काही झाल्याची माहिती प्राप्त झाल्यास एसबीआयसीपीएसएल तात्पुरत्या पद्धतीने शुल्क मागे घेऊ शकेल. त्यानुसार अन्वेषण पूर्ण झाल्यानंतर अशा शुल्कांही जवाबदारी कार्डधारकाच्या खात्यावर असेल. पुढील स्टेटमेंटमध्ये हे शुल्क सुधारित केले जाईल व त्यासह रू. 225 प्रति चार्ज स्लिप इतके चार्ज स्लिप रिट्रिव्हल शुल्क असेल.

h) ग्राहक तक्रार निवारण% सर्व तक्रारींची माहिती पुढील पत्त्यावर नोडल अधिका-याला दिली जावी- पीओ बॅग 28 - जीपीओ, नवी दिल्ली - 110001 Nodalofficer@sbicard.com किंवा ईमेलवर पाठवली जावी.

i) संपर्क तपशील.:

**सर्व फोन्सवरून:** 39 02 02 02 (मोबाईलवरून लावताना आपल्या शहराचा एसटीडी कोड आधी लावावा)

**बीएसएनएल/ एमटीएनएलवरून:** 1860 180 1290/1800 180 1290

**एसबीआय रेल्वे क्रेडीट कार्डसाठी:** एसबीआय रेल्वे क्रेडीट कार्ड हेल्पलाईनला भारतातून कुठूनही फोन करा

**सर्व फोन्सवरून:** 39 02 12 12 (मोबाईलवरून लावताना आपल्या शहराचा एसटीडी कोड आधी लावावा) **बीएसएनएल/ एमटीएनएलवरून:** 1800 180 1295

**पत्र व्यवहार:** मेलद्वारे व्यवस्थापकाला लिहू शकता: ग्राहक सेवा, एसबीआय कार्डस अँड पेमेंटस सर्विसेस प्रा. लि. कंपनी, डीएलएफ इनफिनिटी टॉवर्स, टॉवर सी, 12 वा मजला, ब्लॉक- 2, इमारत 3 डीएलएफ सायबर सिटी, गुडगांव- 122002 (हरयाना), भारत. www.sbicard.com किंवा पीओ बॅग 28 - GPO, नवी दिल्ली - 110001 किंवा **feedback@sbicard.com** वर ईमेल पाठवून.

**4. डिफॉल्ट (थकबाकी)**

जर थकबाकी करण्यात आली, तर कार्डधारकाला वेळोवेळी कार्ड खात्यामध्ये असलेल्या थकित रकमेच्या पूर्ततेसाठी पोस्टाने, फॅक्स, दूरध्वनी, ईमेल, एसएमएस मॅसेज आठवण केली जाईल आणि/ किंवा तिस-या पक्षाची आठवण करून देण्यासाठी, पाठपुरावा करण्यासाठी आणि रक्कम प्राप्त करण्यासाठी मदत घेतली जाईल. अशा प्रकारे नियुक्त केलेला तिसरा पक्ष कर्ज वसुलीसंदर्भातील आचारसंहितेचे पूर्ण पालन करेल.

RBI कडून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त आणि जे SBICPSL सदस्य आहे जे एक क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी एक क्रेडिट कार्ड धारकाच्या मुलभूत स्थिती अहवाल देण्यापूर्वी, आम्ही कार्ड धारकास महिने 'सूचना प्रदान करू.

पुढे असे नोंद केले गेले की एक कार्ड धारक, डिफॉल्टर म्हणून नोंदवली जात पोस्ट तर, त्याच्या / तिच्या थकबाकी कमी, नंतर SBICPSL क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी पासून डिफॉल्टर स्थिती मागे आहे. असे बदल ग्राहकाच्या क्रेडिट अहवालात प्रतिबिंबित करण्यासाठी 45-60 दिवस लागू शकतात.

अटी आणि नियम क्रेडिट कार्डच्या सुविधा नियमन लागू असेल पूरक / कार्ड जोडा SBICPSL विहित नमुन्यात दर महिन्याला क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीसाठी कार्ड डेटा सादर केला. क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी 30 दिवसांची वेळ त्यांच्या सर्व्हरवर सादर डेटा अपलोड करण्यासाठी आहे.

कार्ड खात्यातील एकून थकबाकी व त्यासह लावण्यात आलेल्या कोणत्याही शुल्कांची कार्डधारकाला न आकारण्यात आलेली रक्कमसुद्धा तत्काळ देय होईल आणि प्राथमिक खातेधारकाच्या बँकरप्सीच्या किंवा मृत्युच्या स्थितीत ती एसबीआयसीपीएसएलला संपूर्ण देय ठरेल व कार्ड खाते लगेचच रद्द ठरेल. कार्ड खात्यावर काही थकबाकी असेल, तर प्राथमिक खातेधारकाची मालमत्ता त्याला सेटल करण्यासाठी जवाबदार असेल आणि त्या मालमत्तेद्वारे एसबीआयसीपीएसएलला कोणतीही आर्थिक झळ पोहचणार नाही, ह्याची काळजी घेणे अनिवार्य असेल व त्यामध्ये अशा थकबाकीला प्राप्त करण्यासाठी झालेला कायदेविषयक खर्च व शुल्क ह्यांचा समावेश असेल. अशी परतफेड प्रलंबित झाल्यास एसबीआयसीपीएसएल त्याच्या तेव्हाच्या दराने आर्थिक शुल्क सुरू ठेवण्यासाठी सक्षम असेल.

**5 कार्डधारकत्व समाप्त होणे/ संपुष्टात येणे**

a) एसबीआयसीपीएसएलला लिहून किंवा एसबीआय कार्ड हेल्पलाईनला कॉल करून आणि कार्ड तिरपे कापून कार्डधारक कधीही करार संपुष्टात आणू शकतो. लिखित विनंती केल्यानंतर एड ऑन कार्डसह सर्व कार्ड संपुष्टात येतील. कार्ड खात्यामध्ये थकबाकी असलेल्या सर्व रकमेचा भरणा केल्यानंतर ते संपुष्टात येतील. प्रमाणानुसार (प्रो रेटा बेसिस) वार्षिक, सहभागी होण्याची किंवा रिन्युअल फीस परत केली जाणार नाही.

b) जर एसबीआयसीपीएसएलला काही आधाराने बिजनेससाठी किंवा सुरक्षा कारणांमुळे आणि/ किंवा कायदा सुव्यवस्था यंत्रणेच्या विनंतीमुळे आणि/ किंवा अन्य सरकारी यंत्रणेने तसे सांगितल्यामुळे आणि/किंवा एसबीआयसीपीएसएल व त्याच्या ग्राहकांना लागू असलेल्या कायद्यांमुळे व नियमांमुळे आवश्यक झाले, तर कोणत्याही वेळेस पूर्वसूचना न देता एसबीआयसीपीएसएल कार्डधारकाच्या खात्याच्या वापरावर निर्बंध घालू शकते, ते समाप्त किंवा बंद करू शकते.

जर कार्डधारकाने देय रकमेची थकबाकी केली किंवा क्रेडीट लिमिटचे उल्लंघन केले तर एसबीआयसीपीएसएल क्रेडीट कार्डवरील सुविधा संपुष्टात आणू शकते. हा करार संपुष्टात आल्यानंतर किंवा कार्ड खाते स्थगित करण्यात आले असताना ह्या कार्डाचा वापर वर्जित आहे.

c) अशा परिस्थितीमध्ये कार्डधारकाने तत्काळ (कायद्यानुसार आवश्यक असलेल्या कोणत्याही डिफॉल्ट किंवा अन्य नोटीसनुसार) एसबीआयसीपीएसएलला खात्यावरील एकूण थकीत रक्कम त्वरीत अदा केली पाहिजे. त्यामध्ये कराराअंतर्गत एसबीआयसीपीएसएलला देय असलेल्या सर्व रकमांचा समावेश असेल ज्यामध्ये सर्व ट्रान्सॅक्शन्स आणि अन्य खात्या ज्या खात्यावर अद्याप आकारल्या नसतील ह्यांचा समावेश असेल. जोपर्यंत कार्डधारकाद्वारे अशा सर्व रकमांची थकबाकी जमा केली जाईपर्यंत कार्डधारकाचे खाते समाप्त मानले जाणार नाही.

**6. कार्ड हरवणे/ चोरी/ गैरवापर**

a) जर प्राथमिक किंवा अन्य अतिरिक्त क्रेडीट कार्ड हरवले असेल, चोरीला गेले असेल, त्याला इजा झाली असेल किंवा प्राप्त होणे अपेक्षित असताना प्राप्त झाले नसेल किंवा जर त्याला/ तिला त्याचा वापर अन्य व्यक्तीने कार्डधारकाच्या अनुमतीशिवाय केला अशी शंका आली असेल, तर तत्काळ कार्डधारकाने एसबीआयसीपीएसएलशी एसबीआय कार्ड हेल्पलाईनद्वारे संपर्क साधला पाहिजे. एकदा कार्ड हरवले अशी सूचना दिल्यानंतर ते नंतर परत सापडले तरीही कार्डधारकाने ते कोणत्याही परिस्थितीत वापरू नये आणि त्याने ते कार्ड तिरपे अर्धे कापून टाकावे.

- तसेच कार्डधारक लगेचच आयव्हीआर किंवा आमच्या वेबसाईट sbicard.com द्वारे किंवा एसएमएस आधारित सेवेद्वारे ते कार्ड ब्लॉक करू शकतो.

- एसएमएसद्वारे आपले हरवलेले/ चोरलेले कार्ड ब्लॉक करण्यासाठी, आपल्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकाद्वारे 5676791 वर BLOCK XXXX असा एसएमएस करा. (XXXX = आपल्या कार्ड क्रमांकातील शेवटच्या 4 संख्या). जर 5 मिनिटांच्या आत आपल्याला त्याचे कन्फर्मेशन देणारा एसएमएस मिळाला नाही, तर कार्ड ब्लॉक झाले आहे, असे कृपया मानू नका. तत्काळ आपले कार्ड ब्लॉक करण्यासाठी आणि त्याचा गैरवापर टाळण्यासाठी हेल्पलाईनला कॉल करा.

b) एसबीआयसीपीएसएलला हरवलेल्या कार्डाची माहिती मिळण्याच्या वेळेआधी कार्ड खात्याद्वारे करण्यात आलेल्या कोणत्याही ट्रान्सॅक्शन्ससाठी एसबीआयसीपीएसएल जवाबदार राहणार नाही व त्याची संपूर्ण जवाबदारी कार्डधारकावरच असेल. कार्ड हरवण्याबद्दल किंवा त्याच्या चोरीबद्दल एसबीआयसीपीएसएलला सूचना देण्याशिवाय कार्डधारकाने तत्काळ क्रेडीट कार्डाच्या चोरीची माहिती पोलिसांना देऊन एफआयआर दाखल करायला पाहिजे. परंतु, जेव्हा कार्डधारकाच्या सहमतीने किंवा अतिरिक्त कार्डधारकाच्या सहमतिने एखादि व्यक्ती कार्ड प्राप्त करून त्याचा गैरवापर करत असेल, तेव्हा होणा-या सर्व हानीसाठी कार्डधारक जवाबदार असेल.

c) जर कार्डधारकाने फसवणूकीचे कृत्य केले असेल, तर होणा-या नुकसानाची सर्व जवाबदारी कार्डधारकाची असेल. जार पुरेशी काळजी न घेता कार्डधारक वापर करत असेल तर होणा-या हानीसाठी सर्वस्वी तोच जवाबदार असेल. एसबीआयसीपीएसएलद्वारे निर्धारित करण्यात आलेल्या सुरक्षा नियमांचे पालन करण्यामध्ये कार्डधारकाने कसूर केली असेल तरी हे लागू असेल.

d) कार्डधारक किंवा अन्य कोणत्याही कार्डधारकाला न सांगता एसबीआयसीपीएसएल कार्डच्या हरवण्याविषयी, चोरीविषयी, गैरवापरासंदर्भात कार्डची किंवा पिनची कोणतीही माहिती पोलिसांना किंवा अन्य संबंधित यंत्रणांना देऊ शकते.

e) आपल्या क्रेडीट कार्ड खात्याच्या मोबाईल नंबरसह संपर्क तपशीलामधील बदल सिस्टीममध्ये असलेल्या आपल्या जुन्या तसेच नवीन संपर्क पत्त्यांवर कळवले जातील. आमच्या नोंदींमध्ये आपल्या मोबाईल क्रमांकासह सध्याच्या संपर्क तपशीलांना अद्ययावत ठेवण्याचा सल्ला आपल्याला दिला जातो

f) “एसबीआय कार्ड प्रशंसापर हरवलेल्या / चोरी कार्ड विमा काही कार्ड कव्हर देते. म्हणाला, विमा म्हणून एसबीआय कार्ड निर्णय वेळोवेळी केले जाऊ शकते टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड किंवा इतर कोणत्याही विमा कंपनी द्वारे पुरवली जाते. टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड सेटलमेंट हक्कामुळे उद्भवलेल्या कोणत्याही वाद जबाबदार नाही या संदर्भात आणि एसबीआय कार्ड मध्ये कोणताही दावा निकाली जबाबदार आहे. विमा अटी आणि अधिक तपशीलासाठी, कार्डधारक स्वागत उपकरणे, कपडे, अन्य साधने यांचा संच मध्ये माहितीपत्रक माध्यमातून जा किंवा www.sbicard.com पहा करावा.”

**7. माहिती उघड करणे (डिस्क्लोजर)**

क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी भारतीय आर्थिक प्रणाली कार्यक्षमता आणि स्थिरता सुधारण्यासाठी भारत सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) च्या एक सुरवात आहे. या विविध संस्था चांगले क्रेडिट अटी लाभ घेण्यासाठी बँका आणि वित्तीय संस्था, ज्यामुळे कार्डधारकांना सक्षम दरम्यान माहितीची देवाण-घेवाण प्रभावी यंत्रणा प्रदान करण्यासाठी भारतीय रिर्झव्ह बँकेने प्रयत्न ओळ आहे.

कार्ड धारक SBICPSL क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी करण्यासाठी कार्डधारकाचे माहिती शेअर करण्यासाठी अधिकृत आहे की (RBI कडून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त आहे)

45 - 60 दिवसांच्या काळामध्ये SBICPSL क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी करण्यासाठी कार्डधारकाचे परतफेड रेकॉर्ड संबंधित माहिती प्रदान होईल.

वाद झाल्यास, SBICPSL डिफॉल्टर म्हणून कार्ड धारक कळविण्यापूर्वी अहवाल प्रक्रिया योग्य चुकीची भरपाई होईल. मात्र तो देखील अशा प्रकटीकरण / माहिती प्रकाशन उपलब्ध असलेला वेळ आनुषंगिक होईल नोंद केली जाऊ शकते. तपास आणि असण्याचा अशा वाद सोडवण्यासाठी

कार्डधारक हे मान्य करतो की, एसबीआयसीपीएसएलला कार्डधारकाची माहिती सध्याच्या किंवा भविषयतील क्रेडीट ब्युरोजना देण्यासाठी सक्षम आहे व त्याची सूचना कार्डधारकाला देण्यात येणार नाही आणि अशी माहिती कार्डधारकाच्या सकारात्मक किंवा नकारात्मक वापराशी/ डिफॉल्टशी संबंधित असू शकते. क्रेडीट ब्युरो रिपोर्टमध्ये अशी अपडेट माहिती नोंदवली जाण्यासाठी 45-60 दिवस लागू शकतात.

एसबीआयसीपीएसएल दर धोरण

भारतीय आर्थिक प्रणालीच्या कार्यामध्ये सुधारणा करणे व तिला स्थिरता देणे ह्यासाठी भारत सरकार आणि रिजर्व बँक ऑफ इंडिया (आरबीआय) ह्यांची क्रेडीट ब्युरो ही संस्था आहे. बँका व आर्थिक संस्थांमध्ये माहितीच्या प्रभावी आदान-प्रदानासाठी आरबीआयद्वारे करण्यात येणा-या प्रयत्नांशी हे सुसंगत आहे व त्याद्वारे विविध संस्थांकडून अधिक चांगल्या क्रेडीट टर्म्स प्राप्त करण्यासाठी कार्डधारकाला मदत मिळू शकते.

कार्डधारक हे मान्य करतो की, कार्ड खात्याचे योग्य संचालन, पडताळणी आणि अन्य प्रशासनिक सेवा ह्यांसाठी कार्डधारकाची माहिती ज्यामध्ये एसबीआयसीपीएसएलशी संबंधित आर्थिक संस्था, कंपन्या आणि अन्य तिस-या पक्षांकडील थकबाकी ह्यांची माहिती देण्याचा अधिकार एसबीआयसीपीएसएलला असेल.
एसबीआयसीपीएसएल कार्डधारकाची माहिती एसबीआयसीपीएसएलच्या कोणत्याही वरिष्ठ, कनिष्ठ, संबंधित किंवा भागीदार संस्थेला एसबीआयसीपिएसएलच्या विविध उत्पादनांना व सेवांना उपलब्ध करण्यासाठी/ त्यांच्या मार्केटिंगसाठी किंवा त्याच्या ग्रूप कंपन्या, शाखा, संलग्न आणि/ किंवा भागीदार संस्थांना देऊ शकते.

एसबीआय कार्डच्या महत्त्वपूर्ण अटी व शर्ती www.sbicard.com वरसुद्धा उपलब्ध आहेत.

महत्वाची नियामक माहिती :

- कार्डचा वापर भारत तसेच परदेशात दोन्हीकडे वैध आहे. तथापि, नेपाळ आणि भूतान मध्ये विदेशी चलन व्यवहार करण्यासाठी वैध नाही.
- भारत बाहेर होतात कार्ड वापर रिझर्व्ह एक्सचेंज नियंत्रण नियमावली आणि परकीय चलन व्यवस्थापन कायदा, लागू कायद्यानुसार केली पाहिजे 'ऑनलाइन ट्रेडिंग' पोर्टल द्वारे 1999 परदेशी विनिमय ट्रेडिंग परवानगी नाही. कोणत्याही उल्लंघन किंवा पालन करण्यास अपयश झाल्यास, आपण दंडात्मक कारवाई जबाबदार असू शकते. आपण आपल्या परकीय चलन एंटाइटलमेंट संबंधित आपल्या अधिकृत विक्रेता (AD) सल्ला घ्यावा.
- आपण क्रेडिट कार्ड खात्यावर कोणत्याही क्रेडिट शिल्लक असल्यास, एसबीआय कार्ड आपण ही क्रेडिट शिल्लक परत येण्याचा अधिकार आहे.
- संयुक्त मध्ये रहिवासी करून थेट गुंतवणूक - तो मास्टर दिशा रिझर्व्ह बँकेने अंतर्गत निधी "एक परवानगी पद्धत नाही अशा विदेशी कंपन्या गुंतवणूक पैसे

पाठविणे राजधानी खाते व्यवहार दिशेने / देयके किंवा सेट परदेशातील कंपन्या अप क्रेडिट कार्ड वापरू नका कृपया व्हेंचर / संपूर्ण परदेशात उपकंपनी मालकी

- रहिवाशांना भारत सुविधा विविध पैसे पाठविणे भारतीय रिझर्व्ह बँकेचे मास्टर Circular- मास्टर परिपत्रक नुसार, क्रेडिट कार्ड वापर किंवा लॉटरी तिकीट प्रतिबंधित आयटम खरेदी बंदी जप्त मासिके, जुगार मध्ये सहभाग, कॉल-परत सेवा देणे, इ प्रतिबंधित आहे ., परकीय चलन नाही काढणे अशा आयटम / उपक्रम परवानगी आहे पासून. मास्टर परिपत्रक अधिक माहितीसाठी रहिवाशांना भारत सुविधा विविध पैसे पाठविणे वर संदर्भ घ्या.

एसबीआयसीपीएसएल दर धोरण

1: शुल्कांची सूची

| | |
|---|---|
| फीस | |
| वार्षिक फी (एक वेळेस) | रू. 0 - रू. 4999 |
| रिन्युअल फी (प्रति वर्ष) | रू. 0 - रू. 4999 |
| एड ऑन फी (प्रति वर्ष) | शून्य |
| विस्तारित क्रेडिट | |
| व्याजमुक्त क्रेडीट अवधी | 20-50 दिवस (जर आधीच्या महिन्याचा आउटस्टँडिंग बॅलन्स पूर्ण भरलेला असेल, तर फक्त रिटेल खरेदीवर लागू) |
| आर्थिक शुल्क# | अनसेक्युअर्ड कार्डसाठी 3.35% दरमहा (40.2% प्रति वर्ष); सेक्युअर्ड कार्डसाठी 2.5% दरमहा (30% प्रति वर्ष) |
| किमान देय रक्कम | एकूण आउटस्टँडिंगच्या 5% (किमान. रू. 200) + सर्व लागू कर + ईएमआय (ईएमआयवर आधारित उत्पादनांच्या संदर्भात) +ओव्हीएल राशी (असल्यास) |
| कॅश एडव्हान्स | |
| कॅश एडव्हान्स लिमिट | क्रेडीट लिमिटच्या 80% पर्यंत (गोल्ड आणि टायटॅनिअमसाठी जास्तीत जास्त 12000 /दिवस आणि 15000/ दिवस प्लॅटिनम आणि सिग्नेचर कार्डसाठी) |
| फ्री क्रेडीट लिमिट | शून्य |
| आर्थिक शुल्क# | बाहेर पडण्याच्या दिनांकापासून 3.35% दरमहा (40.2% प्रति वर्ष) |
| कॅश एडव्हान्स फीस | |
| एसबीआय एटीएम्स/ अन्य राष्ट्रीय एटीएम्स | ट्रान्सॅक्शन रकमेच्या 2.5% (आणि कमीत कमी रू. 300 इतकी रक्कम) |
| आंतरराष्ट्रीय एटीएम्स | ट्रान्सॅक्शन रकमेच्या 3% (आणि कमीत कमी रू. 300 इतकी रक्कम) |

| | |
|---|---|
| अन्य | |
| कॅश पेमेंट फीस | रू.100 |
| चेक पिकअप | रू. 90 |
| चेक फी | रु. 100 (चेकने पैसे भरले रु. 2000 पर्यंत) |
| पेमेंट डिसऑनर फी | चेक रकमेच्या 2% (फी कमीत कमी रू. 350 असेल) |
| स्टेटमेंट रिट्रिवल | रू. 100 प्रति स्टेटमेंट (>2 महिन्यांहून जुने ) |
| चार्ज स्लीप रिट्रिवल] | रू. 225 प्रति चार्ज स्लीप |
| लेट पेमेंट (उशीरा रकमेचा भरणा) | रू. 0- 200 इतक्या रकमेसाठी शून्य ;<br>रू. 200 ते रू. 500 एकूण देय रकमेसाठी रू. 100;<br>रू. 500 ते रू. 1000 एकूण देय रकमेसाठी रू. 400;<br><br>रू. 1000 ते रू. 10,000 एकूण देय रकमेसाठी रू. 500;<br>रू. 10,000 पेक्षा जास्त एकूण देय रकमेसाठी रू. 750; |
| ओव्हरलिमिट | ओव्हरलिमिट रकमेच्या 2.5% (फी कमीत कमी रू. 500 असेल) |
| कार्ड रिप्लेसमेंट | रू. 100 - रू. 250 |
| आपात्कालीन कार्ड रिप्लेसमेंट (विदेशात असताना) | वास्तविक खर्च (किमान $175) |
| विदेशी चलन ट्रान्सॅक्शन | रूपांतरण चिन्हांकित करा: 3.5% (एलिट कार्ड सोडून सर्व कार्डसाठी)<br>1.99% (फक्त एलीट कार्ड धारकासाठी) |
| रिवार्डस रिडम्प्शन फी | रू. 99 |
| सरचार्ज | |
| रेल्वे तिकिटे - रेल्वे काउंटर्स | रू. 30 + ट्रान्सॅक्शन रकमेचे 2.5% |
| रेल्वे तिकिटे - www.irctc.co.in | ट्रान्सॅक्शन रकमेच्या 1.8% + लागू असलेले सेवा शुल्क |

| | |
|---|---|
| पेट्रोल पंपांवर विकण्यात आलेले पेट्रोल आणि अन्य उत्पादने/ सेवा | ट्रान्सॅक्शन मूल्याचे 1 % किंवा रू. 10 ह्यापैकी जे अधिक असेल ते<br>एका ट्रान्सॅक्शनवर 1 % सरचार्ज माफी (सरचार्ज वेव्हर) (सर्व लागू कर+ अन्य शुल्क वगळता);<br>सिग्नेचर आणि प्लॅटिनमसाठी रू. 500 ते रू. 4000<br>अन्य सर्व कार्डससाठी रू.500 ते रू. 3000.<br><br>सिग्नेचर आणि प्लॅटिनम कार्डसाठी प्रति क्रेडीट कार्ड अकाउंटवर प्रति स्टेटमेंट सायकल अधिकतम रू. 250 इतक्या सरचार्जवर माफी (सरचार्ज वेव्हर); अन्य सर्व कार्डससाठी रू. 100 प्रति क्रेडीट कार्ड खाते |
| कस्टम्स ड्युटीचे पेमेंट | सर्व ट्रान्सॅक्शनचे 2.25% (कमीत कमी रू. 75) |

लागू असलेले सर्व कर वरील सर्व फीस, व्याज आणि शुल्कांवर लावले जातील.

- "नियोजित कर" (1 जुलै, 2017 रोजी किंवा नंतर जारी केलेल्या निवेदनासाठी) म्हणजे:
- स्टेट बँक कार्डच्या नोंदीत राहणारे कार्डधारक स्टेटमेंटच्या  तारिख "हरियाणा" - 9% सेंट्रल कर आणि 9% राज्य कर
- कार्डधारक एसबीआय कार्डच्या नोंदीतील राहण्याचे राज्य करण्यासाठी "हरियाणा" व्यतिरिक्तच्या तारखेला - 18% @ समन्वित कर

कार्डधारक खात्यासाठी करण्यात येणारे सर्व पेमेंटस किमान देय रक्कम, फीस आणि अन्य शुल्क, व्याज शुल्क, बॅलन्स आउटस्टँडिंग, पर्चेस आउटस्टँडिंग आणि कॅश एडव्हान्स ह्या क्रमाने सेटल करण्यात येतील (ज्यामध्ये सर्व लागू कर + ईएमआय आधारित उत्पादनांचे ईएमआय + 5% एकूण आउटस्टँडिंग असेल).